महाराष्ट्र शासन

**शासन परवानगी आदेश**

क्रमांक- इंमाशा २०११/९४ /११/माशि-१,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२,
दिनांक:- २५.१०.२०११.

प्रति,

अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
शिवाजीनगर, पुणे.

**विषय :-** इंग्रजी माध्यमाच्या इ. ७ वीपर्यंत सुरु असलेल्या प्राथमिक शाळेस जोडून इ. ८ वी ते इ. १० वी चे इंग्रजी माध्यमाचे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, क्र. नमाशा २०१०/(९६/२०१०) /माशि-१, दि.१०.३.२०१०.
२) शासन निर्णय, क्र. नमाशा २०१०/(९६/२०१०) /माशि-१, दि.१४/१०/२०१०
३) संस्थेचा दि. १२.०८.२०११ रोजीचा अर्ज व सर्व संबंधित कागदपत्रे.

सोबत जोडलेल्या संस्थेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, **एलिस मेमोरियल एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई** या संस्थेद्वारे संचलित इंग्रजी माध्यमाच्या इ. ७ वीपर्यंत सुरु असलेल्या **रेवूड इंटरनॅशनल स्कूल, लोणावळा, जि.पुणे** येथील प्राथमिक शाळेस जोडून इंग्रजी माध्यमाचे इ. ८ वी ते १० वी चे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास शासन स्तरावरुन पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे :-

१) परवानगी आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत संस्थेने राज्यमंडळाकडे संलग्नता प्रमाणपत्रा करिता (प्रथम प्रोव्हीजनल व नंतर रेग्युलर) अर्ज करणे आवश्यक राहील.

२) सदर परवानगी आदेश राज्य मंडळातर्फे दिल्या जाणाऱ्या संलग्नता प्रमाणपत्राकरिता (रेग्युलर ॲफीलीएशन) आवश्यक असणाऱ्या सर्व निकषांची पूर्तता करण्याच्या अधीन राहतील.

३) राज्य मंडळाने संलग्नता प्रमाणपत्राकरिता(रेग्युलर ॲफीलीएशन)निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता न केल्यास सदर परवानगी आदेश रद्द समजण्यात येतील.

४) परवानगी दिलेल्या ठिकाणावरुन सदर शाळेचे स्थलांतर करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

५) संबंधित शाळेने शासन, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे व राज्य मंडळ यांच्यातर्फे निर्गमित केल्या जाणाऱ्या सर्व आदेशांचे पालन करणे बंधनकरक राहील.

६) परवानगी देण्यात आलेल्या इ. ८ ते १० वीच्या वर्गांमध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम शिकविणे आवश्यक राहील.

७) परवानगी आदेशाच्यावेळी शाळेत सुरु असलेल्या सर्व वर्गांना या आदेशाद्वारे परवानगी देण्यात येत आहे.

(सतीश जोंधळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी-
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे
मा.मंत्री(शाशि) यांचे खाजगी सचिव /मा.राज्यमंत्री (शाशि) यांचे खाजगी सचिव
विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे / शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, पुणे
सचिव, **एलिस मेमोरियल एज्युकेशन ट्रस्ट, डी-५, नूतन नगर,** बांद्रा (प.) मुंबई-५० / निवड नस्ती, माशि-१.